आषाढ/श्रावण शके १९३४
जुलै २०१२

Country Code : ISSN-0972-3218/2006

# सहकारी महाराष्ट्र




महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे १

E-mail : sahasangh@yahoo.in

# सहकारी महाराष्ट्र

सहकारी शिक्षण, प्रशिक्षण, प्रसिद्धी याशी कटिबद्ध

वर्ष ५१ अंक ९ वा

जुलै २०१२



संपादिका : श्रीमती गायत्री कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे

## सल्लागार समिती

अॅड. श्री. सुहासराव तिडके
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म., पुणे

श्री. चंद्रकांत काळे
उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म., पुणे

श्री. अशोकराव जगताप
मानद सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म., पुणे

श्री. मधुकर चौधरी (भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १



सहकारी महाराष्ट्र हे मासिक प्रत्येक महिन्याच्या चौदा तारखेस प्रसिद्ध होते

वार्षिक वर्गणी २५०/- रुपये
आजीव वर्गणी ३,०००/- रुपये



लेखातील मते लेखकांचीच. संपादक व म. रा. सह. संघ त्याच्याशी सहमत असेलच असे नाही.


## अंतरंग


❏ संपादकीय ४

❏ शेतीचे चांगले दिवस – श्री. अनिरुद्ध अष्टपुत्रे ५

❏ बळीराजाला 'बळ' – श्री. संजय देशमुख ११

❏ जागतिकीकरणाच्या युगामध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे सिंहावलोकन – प्रा. बी. एच. मोहिते १३

❏ पर्यावरण आणि शाश्वत विकास – प्रा. डॉ. राजाराम एन. वाकचौरे १७

❏ सहकार आणि उदारीकरण – डॉ. श्रीनिवास व्ही. जोशी २३

❏ शेतकऱ्यांच्या हितासाठी २६

❏ सेंद्रिय शेतीमुळे पर्यावरणाचेही रक्षण – डॉ. जी. पी. सुर्वे, डॉ. (सौ.) चंदन जी. सुर्वे २७

❏ नागरी सहकारी पतसंस्थासमोरील समस्या व त्यावरील उपाययोजना – श्री. प्रदिप बन्सी शिंगोटे, प्रा. डॉ. के. पी. बैरागी २९

❏ 'बंधपत्रा'तून सुटका.... – श्री. डी. आर. कुलकर्णी ३०

❏ ग्रामविकासाची गुढी ३१

❏ आपलं गाव – आपलं सरकार ३३

❏ ग्रामविकासाची पायाभरणी ३६

❏ राज्यविशेष ३८

# जागतिकीकरणाच्या युगामध्ये महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे सिंहावलोकन

- प्रा. मोहिते बी. एच.
अधिव्याख्याता, वाणिज्य शाखा
पी. व्ही. पी. कॉलेज, कवठे महांकाळ, जि. सांगली

प्रस्तावना :

सन २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे होत आहे. युनोने सहकार चळवळीतील अगभूत क्षमता लक्षात घेऊन सध्याच्या आर्थिक उदारीकरणाच्या, खाजगीकरणाच्या व जागतिकीकरणाच्या युगामध्ये समाजातील दुर्बल व कमकुवत घटकांच्या हितरक्षणासाठी सहकार हे एक प्रभावी माध्यम ठरू शकते याची जाणीव संपूर्ण जगामध्ये व्हावी या हेतूने पाऊल उचलले आहे. सर्व आंतरराष्ट्रीय संघटनांनी सहकार चळवळीचे सामाजिक विकासातील महत्त्व व भूमिका विचारात घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाच्या १८ डिसेंबर २००९ च्या ६४ व्या अधिवेशनामध्ये सन २०१२ हे आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष म्हणून जाहीर करण्याचा ठराव संमत केला आहे. त्या अनुषंगाने व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने सहकार चळवळीचे सिंहावलोकन करणे गरजेचे आहे.

## सहकार चळवळीचे सामाजिक योगदान :

भारतातील सहकार चळवळीने एका शतकाची वाटचाल पूर्ण केली आहे. वास्तविक सहकाराचा इतिहास नागरी समाज जीवनाइतकाच प्राचीन आहे. कोणत्याही समाजातील एकूण अस्तित्वासाठी समाजातील सर्व सदस्यांमध्ये सहकाराची किमान भावना असणे गरजेचे आहे. भारतातील नागरी तसेच ग्रामिण संस्कृतीमध्ये समाजातील विविध घटकांमध्ये सहकाराची बीजे रोवली गेली आहेत असे म्हणणे चुकीचे होणार नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाने कल्याणकारी राज्याची कल्पना अंमलात आणली. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून दुर्बल घटकांच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी सहकारी संस्थांना अर्थसहाय्य देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. 'सहकार' हा विषय घटनेनुसार राज्य सुचिमध्ये समाविष्ट केल्याने घटक राज्यांनी त्यांचे स्वतंत्र सहकारी कायदे पारित केले. त्याप्रमाणे राज्यामध्ये सहकारी संस्था अधिनियम कायदे अंमलात आले.

## महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे योगदान :

महाराष्ट्र हे देशातील प्रगत व अग्रेसर राज्य असल्याने सहकारी चळवळ ही विविधांगी व सामाजिक जीवनाच्या सर्व टप्प्यांना सामावून घेणारी आहे. कृषी पतपुरवठ्यापासून बिगर कृषी पतपुरवठा, कृषी प्रक्रिया, पणन, गृहनिर्माण, औद्योगिक इ. सर्व क्षेत्रामध्ये सहकारी संस्थांचे जाळे पसरले आहे. राज्यामध्ये आजमितीस सुमारे सव्वादोन लाखांहून अधिक सहकारी संस्था असून त्यांचे सभासदत्व साडेपाच कोटीपेक्षा अधिक आहे. तसेच महाराष्ट्रातील सहकारी विविध संस्था, बँका, प्रक्रीया संस्था, कारखाने यांच्या खालील माहितीद्वारे सहकारी चळवळीचे योगदान स्पष्ट होईल.

- महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची संख्या — ३१
- महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची संख्या — ५३९
- महाराष्ट्रातील विविध कार्यकारी सहकारी संस्था संख्या — २१,३८४
- महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्थांची संख्या — १५,३३५
- महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने संख्या — २०१
- महाराष्ट्रातील पणन सहकारी संस्था संख्या — १,४७४
- महाराष्ट्रातील जिनिंग प्रसिंग सहकारी संस्था — २७१
- महाराष्ट्रातील इतर सहकारी संस्था संख्या — ८९,७८०



Scanned with OKEN Scanner